जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५७९ दिनांक - २६/०७/२०२३**

पोलीस आयुक्तालय, पुणे शहर कार्यक्षेत्रामध्ये

## कोंम्बींग ऑपरेशन राबवुन सराईत गुन्हेगारांवर केली प्रतिबंधक कारवाई

श्री. रितेश कुमार, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामध्ये कोंम्बींग ऑपरेशन करुन गुन्हेगारांना चेकींग करुन प्रतिबंधक कारवाई करणे, तसेच हॉटेल/लॉजेस/ढाबे, एस. टी. व बस स्थानके, रेल्वे स्टेशन, तसेच सार्वजनिक ठिकाणी आढळून येणारे संशयीत इसम/घटना इत्यादी कसून तपासणी करणे बाबत आदेश दिले होते. त्याप्रमाणे पुणे पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामधे गुन्हे शाखा व पोलीस ठाणे कडील अधिकारी व अंमलदार यांची पथके स्थापन करुन पुणे शहरातील वेगवेगळया परीसरात दिनांक २५/०७/२०२३ रोजी रात्रौ २१.३० ते दिनांक २६/०७/२०२३ रोजी ०१.०० वा. पर्यत कोंम्बींग ऑपरेशन व तपासणी करुन खालील प्रमाणे कारवाई केलेली आहे.

**आरोपी चेकींग अभियानमध्ये एकुण २११६ गुन्हेगारांना चेक करण्यात आले असून त्यापैकी ६०२ गुन्हेगार मिळुन आले आहेत.**

विशेष मोहिमे दरम्यान पुणे शहर पोलीस आयुक्तालयामध्ये एकुण १० आर्म ॲक्ट गुन्ह्यांमध्ये एकुण ११ आरोपी अटक करुन त्यांचेकडुन १ गावठी पिस्टल, १ दुचाकी मोपेड, १ मोबाईल, १ चामडी पाकीट, तसेच १० धारदार हत्यारे असा एकुण रु. १,६५,१४०/- किंमतीचा मुद्‌माल जप्त करण्यात आलेला आहे.

**परिमंडळ १ मधील एकुण ६ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :-**

परिमंडळ १ मध्ये विशेष मोहीम दरम्यान मपोका १४२ प्रमाणे १ केस करुन १ आरोपीस अटक केली आहे. तसेच प्रोव्हिबिशन प्रमाणे ३ केसेस करण्यात आलेल्या असुन ३ आरोपींकडुन रु. ४,५१५/- चा तसेच जुगार ॲक्ट प्रमाणे एकुण १ केसेस करुन २ आरोपींकडुन रु. १,६२०/- चा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

**परिमंडळ २ मधील एकुण ६ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :-**

परिमंडळ-२ मध्ये विशेष मोहिमे दरम्यान गुन्ह्यात निष्पन्न परंतू अटक नसलेले एकुण २ आरोपी अटक करण्यात आलेले आहे. प्रोव्हिबिशन प्रमाणे ५ केसेस करण्यात आलेल्या असुन ५ आरोपींकडुन रु. ७,५००/- चा तसेच जुगार ॲक्ट प्रमाणे एकुण १ केसेस करुन ३ आरोपींकडुन रु. १,६८०/- चा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

**परिमंडळ ३ मधील एकुण ६ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :**

परिमंडळ-३ मध्ये विशेष मोहिमे दरम्यान मोक्यामधील गुन्ह्यात १ आरोपी अटक करण्यात आलेले आहे. तसेच निष्पन्न परंतू अटक नसलेले एकुण २ आरोपी अटक करण्यात आलेले आहे. मपोका १४२ प्रमाणे १ केस करुन १ आरोपीस अटक केली आहे. प्रोव्हिबिशनमध्ये एकुण ४ केसेस करुन ४ आरोपीकडुन रु. २,९१०/- चा तसेच जुगार ॲक्ट प्रमाणे एकुण १ केसेस करुन २ आरोपींकडुन रु. ७५०/- चा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

**परिमंडळ ४ मधील एकुण ७ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :**

परिमंडळ-४ मध्ये विशेष मोहिमे दरम्यान गुन्ह्यात निष्पन्न परंतू अटक नसलेले एकुण ३ आरोपी अटक करण्यात आलेले आहे. मपोका १४२ प्रमाणे २ कारवाई करुन २ आरोपी अटक केले आहे. तसेच प्रोव्हिबिशनमध्ये एकुण १३ केसेस करुन १४ आरोपीकडुन रु. १०,८५०/- चा तसेच जुगार ॲक्ट प्रमाणे एकुण ७ केसेस करुन १६ आरोपींकडुन रु. १०,३२५/- चा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

**परिमंडळ ५ मधील एकुण ७ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :**

परिमंडळ - ५ मध्ये विशेष मोहिमे दरम्यान मपोका १४२ प्रमाणे २ केस करुन २ आरोपीस अटक केली आहे. प्रोव्हिबिशन ॲक्ट प्रमाणे एकुण ९ केसेस मध्ये १० आरोपी यांना अटक करुन त्यांचेकडुन रु. १२,१५०/- चा तसेच जुगार ॲक्ट प्रमाणे एकुण २ केसेस करुन २ आरोपींकडुन रु. १,७६५/- चा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. एनडीपीएस प्रमाणे १ कारवाई करुन १ आरोपीकडुन २५० ग्रॅम गांजा रु. ५,०००/- चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

**गुन्हे शाखेने केलेली कारवाई खालीलप्रमाणे :**

गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईमध्ये मपोका १४२ प्रमाणे १ कारवाई करुन १ आरोपीस अटक केली आहे. प्रोव्हिबिशन ॲक्ट प्रमाणे एकुण १० केसेस मध्ये १० आरोपी यांना अटक करुन त्यांचेकडुन रु. १९,२६०/- चा तसेच जुगार ॲक्ट प्रमाणे एकुण १ केसेस करुन ३ आरोपींकडुन रु. २,५४०/- चा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

**सदर विशेष मोहिमे दरम्यान एकुण कारवाईचा आढावा घेतला असता खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.**

- सहकारनगर, स्वारगेट, वारजे माळवाडी, अलंकार, चंदननगर, लोणीकंद हडपसर व बिबवेवाडी पोलीस स्टेशनने बेलेबल व नॉन बेलेबल वारंट बजावणी उत्कृष्ठपणे केलेली आहे.
- मुंबई प्रोव्हिबीशन ॲक्ट प्रमाणे एकुण गुन्हे शाखेने १० केसेस करुन १० आरोपींकडुन रोख व गावठी दारु असा रु. १९,२६०/- व पोलीस स्टेशनने ३४ केसेस करुन ३६ आरोपींकडुन रु. ३७,९२५/- मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
- महा.जुगार ॲक्ट प्रमाणे गुन्हे शाखेने १ केस करुन ३ आरोपींकडुन जुगार साहित्य व रोख रु. २,५४०/- व पोलीस स्टेशनने जुगार ॲक्ट प्रमाणे एकुण १२ केस करुन २५ आरोपींकडुन रु. १६,१४०/- चा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.
- तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा १४२ प्रमाणे गुन्हे शाखेने १ व पोलीस स्टेशनने ६ तडीपार गुन्हेगारांवर कारवाई केलेली आहे.
- पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील एकुण ५७१ हॉटेल, ढाबे व लॉजेस चेक, तसेच १५५ एस टी स्टॅण्ड/ रेल्वे स्थानक/ निर्जन ठिकाणे चेक करण्यात आले आहे.
- वाहतुक शाखेकडुन ९३४ संशयित वाहन चालकांना चेक करुन २१३ जणावंर वाहन धारकांवर कारवाई करुन रु. १,४६,५००/- दंड वसुल करण्यात आला आहे.

वरील प्रमाणे मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री.रितेश कुमार, यांचे आदेशान्वये, मा.पोलीस सहआयुक्त, पुणे शहर, श्री. संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे, श्री.रामनाथ पोकळे, मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, श्री. रंजनकुमार शर्मा, मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, श्री. प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री.अमोल झेंडे, मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, संदीप सिंह गिल्ल, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-२, श्रीमती स्मार्तना पाटील,मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, सुहेल शर्मा, मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-४, श्री. शशिकांत बोराटे, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-५, श्री.विक्रांत देशमुख, मा.पोलीस उप आयुक्त,वाहतुक विभाग,श्री.विजयकुमार मगर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा व पोलीस ठाणेकडील अधिकारी / अंमलदार तसेच वाहतुक विभागाकडील अधिकारी / अंमलदार यांचे पथकाने संयुक्तपणे उपरोक्त कामगिरी केली आहे. यापुढेही कोंम्बींग ऑपरेशन व नाकाबंदी चेकींग राबवुन गुन्हेगारांचे हालचालींवर सक्त नजर ठेवून त्यांचेवर प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.

| अ.नं. | तपशील | एकुण कारवाया | अटक आरोपी |
|---|---|---|---|
| १ | **आर्म्स ॲक्ट** | १० | ११ |
| २ | **मुंबई प्रोव्हिबीशन ॲक्ट** | ४४ | ४६ |
| ३ | **मपोका क १४२ प्रमाणे** | ७ | ७ |
| ४ | **जुगार ॲक्ट** | १३ | २८ |
| ५ | **एनडीपीएस कारवाई** | १ | १ |
| **एकुण** | | ७५ | ९३ |